ठाणे, मंगळवार दि. ३ सप्टेंबर २०२४ वर्ष : १३, अंक : १२७ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

अग्रलेख

मातृसंघटना - भाजपातील मतभेदाचा मुद्दा

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाला सर्वाधिक म्हणजे २४० जागा मिळाल्या. केंद्रात सत्ता आहे, तरी भाजपाला अपेक्षित जागा मिळू शकलेल्या नाहीत.....पान २ वर

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper
PDF
www.maharashtrasamrat.com

तापमान

कमाल	किमान
३६° से	२९° से

बाजार

सोने	चांदी
७३,२८०	९३,६८०

डोकं खाजवा –अशोक सुतार

या या ! तुमच्यासारख्या स्टार हिरॉईन आमच्या पक्षात आल्या आहेत तर भाग्यच उजळणार आमचं आणि जनतेचंही !

थोडक्यात घडामोडी

अंबरनाथमध्ये भाजप-शिंदे गटात पुन्हा वाद

अंबरनाथ : कल्याणमधील भाजप आणि शिंदे गटातील नेत्यांमधील जुना वाद कायम असल्याचे समोर आले आहे. अंबरनाथ तालुक्यातील द्वारली गावातील जागेवरून झालेला भाजप आमदार गणपत गायकवाड आणि शिंदे गटाचे महेश गायकवाड यांच्यातील वाद कायम असल्याचे समोर आले आहे. ज्या जागेवरून या दोघांमध्ये गोळीबार करण्यापर्यंत टोकाचे वाद झाले. त्याच जागेची पुन्हा एकदा मोजणी करण्यात आली आहे. मोजणीच्या ठिकाणी आमदार गणपत गायकवाड यांचा एक समर्थक हत्यार घेऊन आल्याचा महेश गायकवाड यांचा दावा आहे. दोन्ही पक्षातील नेत्यांच्या आरोप-प्रत्यारोपानंतर प्रकरण पुन्हा उल्हासनगर हिललाईन पोलीस स्टेशनमध्ये गेलं. उल्हासनगरच्या हिललाईन पोलिसांनी संबंधित व्यक्तीला ताब्यात घेतलं आहे. त्याच्या बॅगेत बंदूक आणि हत्यार सापडले आहेत. ही बंदूक वैध आहे की अवैध याची तपासणी सुरु आहे.

लाडकी बहीण योजनेला मुदतवाढ मिळणार ?

लाडकी बहीण योजनेसंदर्भात मोठी अपडेट समोर आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेला सप्टेंबर अखेरपर्यंत मुदतवाढ मिळण्याची शक्यता आहे. सूत्रांनी ही माहिती दिली आहे. आधी या योजनेचा अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्ट होती शेवटची मुदत होती. अधिकाधिक महिलांना लाभ घेता यावा यासाठी सरकारकडून मुदतवाढ देण्यात आली आहे. लवकरच महाराष्ट्र सरकार यासंदर्भात निर्णय जाहीर करण्याची शक्यता आहे.

आवक कमी झाल्याने भाज्या महागल्या

नगर – अल्प पावसामुळे भाजीपाल्याचे दर वाढू लागले आहेत. त्याचा फटका नागरिकांना बसू लागला आहे. भाज्यांची आवक कमी झाल्यामुळे त्यांचे दरही वाढू लागले आहेत. भेंडी, वांगे, मिरचीचा एका किलोचा दर ५० रुपयांपर्यंत गेला आहे. तर एक किलो वटाण्याच्या शेंगा खरेदी करण्यासाठी ९० ते १०० रुपये मोजावे लागत आहेत.

जिल्ह्यामध्ये एक जूनपासून आज अखेर पर्यंत सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. अतिवृष्टीचा परिणाम शेती उत्पादनावर होऊ लागला असून नियमित होणाऱ्या उत्पादनात घट झाली आहे. त्यामुळे बाजार समितीत होणारी भाजीपाल्याची आवक कमी झाली असून याचा फटका थेट ग्राहकांना बसू लागला आहे.

भाज्यांचे दर कडाकडले....

भेंडी, वांगे, मिरची यांचे दर किरकोळ बाजारात पन्नास रुपयांच्या पुढे गेले आहेत. दोडके, कारले, दुधी भोपळा यांचे दरही ३५ ते ४० रुपयांपर्यंत गेले आहेत. बाजारामध्ये सध्या टोमॅटो १५ ते २० रुपये, बटाटे २२ ते २५ रुपये, कांदे १८ ते २० रुपये, काकडी २० ते २५ रुपये किलो दराने विकली जात आहे. मेथीच्या एका जूडीसाठी ११० रुपये तर कोथिंबीरसाठी २०० रुपये मोजावे लागत आहे. भाज्यांची ही दरवाढ किमान दहा ते पंधरा दिवस कायम राहण्याची शक्यता असल्याने यंदाच्या दिवाळीत भाज्या महाग खाव्या लागण्याची शक्यता आहे.

अतिवृष्टीमुळे मार्केटमध्ये भाज्यांची आवक घटली असून तेथेच दहा ते पंधरा टक्क्यांनी दर वाढले आहेत. त्याचा परिणाम भाज्यांच्या किरकोळ बाजारावर सुद्धा झाला असून दरामध्ये वाढ झाली आहे. मार्केटमध्ये होणारी भाज्यांची आवक अशाच पद्धतीने घटत राहिली, तर येणाऱ्या दोन ते तीन महिन्यात अजूनच दरवाढ होण्याची शक्यता आहे.

– अक्षय वाळके, भाजी विक्रेते.

कोथिंबीरच्या एका जुडीला २०० रुपयांचा भाव, तर मेथीला ११० रुपयांचा दर

जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नारायणगाव उपबाजार केंद्रामध्ये रविवारी, १ सप्टेंबर २०२४ ला कोथिंबिरीच्या एका जुडीला तब्बल २०० रुपये एवढा उच्चांकी दर मिळाल्याचं पाहायला मिळालं. तर मेथीच्या भाजीला ११० रुपये प्रति जुडी असा दर मिळाला. कोथिंबीरीला २० हजार रुपये शेकडा तर मेथीचा दर १० हजार रूपये शेकडा भाव मिळाला. आजपर्यंतच्या नारायणगाव उपबाजार केंद्राच्या इतिहासातील २० हजार रुपये प्रति शेकडा हा उच्चांकी दर कोथिंबिरीला मिळाला आहे.

दरम्यान, मुंबई, पुण्यासारख्या शहरी भागांत पावसानं दडी मारली असली, तरीदेखील पुणे ग्रामीणसह, मराठवाड्यात मुसळधार पावसानं हैदोस घातल्याचं पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतमालाचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. नुकसान झालेल्या शेतमालामध्ये कोथिंबीर, मेथीचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. त्यामुळे कोथिंबीर आणि मेथीची बाजारात आवाक फारच कमी आहे. अशातच, बाजारात फारच कमी प्रमाणात कोथिंबीर, मेथी उपलब्ध आहे.शेतमालाची आवाक कमी झाल्यामुळे कोथिंबीर आणि मेथीच्या दरांवर मोठा परिणाम झाला आहे.

गणेशोत्सवात शोध महाराष्ट्राच्या रत्नांचा या अनोख्या स्पर्धेचे आयोजन

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्यातर्फे

महाराष्ट्राचा सुखकर्ता व Reel To रिअल महाराष्ट्र या रील स्पर्धेचे आयोजन

मुंबई – शिवसेना युवासेनाच्या वतीने गेली अनेक वर्षपासून मुंबई, ठाणे येथे गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात येत होते. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांच्या वतीने ही स्पर्धा मुंबई, ठाणे मर्यादित न राहता संपूर्ण राज्यात केली जात आहे. राज्यस्तरीय गणपती स्पर्धेचे आयोजन युवासेनेच्या वतीने करण्यात येत असून यामध्ये ही स्पर्धा ८ विभागात विभागली गेली आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती, नागपूर अशा ८ विभागात ही स्पर्धा होणार आहे.

गणेशोत्सव मंडळांना या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी yuvasenaofc.in या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. प्रत्येक विभागात बक्षिसे दिली जाणार आहेत. प्रथम पारितोषिक ५ लाख व आकर्षक ट्रॉफी, द्वितीय पारितोषिक ३ लाख व आकर्षक ट्रॉफी, तृतीय पारितोषिक २ लाख व आकर्षक ट्रॉफी, व चौथे पारितोषिक १ लाख व आकर्षक ट्रॉफी दिली जाणार आहे. तसेच प्रत्येक विभागात २५ मंडळांना २५ हजाराचे पारितोषिक देण्यात येणार आहे. तसेच एका विभागात १७ लाख २५ हजारांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. ८ विभागांचा समावेश करुन घेतला तर १ कोटी ३८ लाखांचे (पान २ वर)

पुण्यात कौटुंबिक वादातून माजी नगरसेवक वनराज आंदेकरांची हत्या

■ पाच राऊंड फायर, कोयत्याने वार

पुणे – विद्येचे माहेरघर असलेले पुणे गुन्हेगारीमुळे पुन्हा एकदा चर्चेत आलं आहे. पुणे शहरातील नाना पेठमधील कुख्यात गुंड बंडू आंदेकर याचा मुलगा माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची हत्या करण्यात आली. १ सप्टेंबर रविवारी रात्री नऊ वाजता आपल्या घराजवळ उभा असलेल्या वनराज आंदेकरांवर गोळीबार झाला. त्यानंतर हल्लेखोरांनी कोयत्याने वार करत त्यांना जागीच संपवलं. नाना पेठ डोके तालीमजवळ हा सर्व प्रकार घडला. चार-पाच दुचाकीवर आलेल्या दहा ते बारा जणांनी वनराज यांचा मर्डर केला. या घटनेमुळे परत एकदा पुण्यातील गुन्हेगारी डोके वर काढत असल्याचं दिसत आहे. (पान २ वर)

सख्या बहिणीकडूनच भावाची सुपारी

याच घरगुती संपत्तीच्या वादातून सख्या बहिणीनेच आपल्याच भावाची सुपारी दिली. जयंत कोमकर, गणेश कोमकर यांनी सोमनाथ गायकवाड याला वनराज यांची सुपारी दिल्याची माहिती समजली आहे. रविवारी संध्याकाळी आंदेकर यांच्या घरात कौटुंबिक कार्यक्रम होता, त्यानंतर ते नऊच्या सुमारास आपल्या चुलत भावासह खाली उभे राहिले होते. त्यावेळी अचानाक दुचाकीवाले त्यांच्याजवळ आले आणि गोळीबार करू लागले. जवळपास दहा ते बारा हल्लेखोरांनी त्यांच्यावर हल्ला चढवला. पाच राऊंड फायर केले त्यानंतर काहींनी आपल्या शर्टमध्ये लपवलेला कोयता बाहेर काढला आणि त्यांच्यावर वार केले.

हत्येमागे काय कारण ?

वनराज आंदेकर आणि त्यांच्या बहिणींमध्ये संपत्तीवरून वाद होता. गणेश कोमकर याला नाना पेठेमधील एक दुकान दिले गेले होते. मात्र ते दुकान महापालिकेने अतिक्रमण कारवाईमध्ये पाडले. यावरून दोन्ही कुटूंबात वाद सुरू होता. जावई गणेश कोमकर यानेही आपली गँग तयार केली होती. आंदेकर यांच्याच नावाचा फायदा घेऊन तो गुंडगिरी करत होता. आंदेकरांच्या एका माणसासोबत त्याचं भांडण झालं होतं. या भांडणामध्ये गणेश कोमकरला मारहाण झाली होती. दुकाने पाडले गेल्याने आणि या भांडणामध्ये झालेल्या मारहाणीच्या रागातून दोन्ही कुटूंबातील तणाव वाढला होता. यादरम्यान तुला पोरं बोलवून ठोकते अशी धमकी वनराज यांना त्यांच्या बहिणीने दिली होती.'

पोलिसांनी चौघांना अटक केली

दरम्यान, वनराज आंदेकर यांचे वडील म्हणजेच कुख्यात गुंड बंडू आंदेकर यांनी समर्थ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. वनराज यांच्या दोन बहिणी आणि त्यांच्या पतींच्या सांगण्यावरून हा खून झाल्याची फिर्याद पोलीस ठाण्यात दिली आहे. पोलिसांनी चौघांना अटक केली असून या प्रकरणाचा पोलीस करत आहे.

भविष्य निधी कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या समस्या राजन विचारे यांनी आयुक्तांकडे मांडल्या

उाणे- ठाण्यातील वागळे इस्टेट एमआयडीसी इमारतीतील भविष्य निधी कार्यालयात भविष्य निधी कर्मचारी संघटनांनी या संघटनेचे संरक्षक म्हणून निवड झाल्यानंतर कार्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमाला ठाणे कार्यालयाच्या सचिव रेवती नाईक यांनी आमंत्रित केले होते. या कार्यक्रमासाठी शिवसेना नेते माजी खासदार राजन विचारे यांचे जल्लोषात कर्मचाऱ्यांनी स्वागत करून आपल्या संघटनेच्या कार्यालयात बैठक आयोजित केली होती. या बैठकीत सर्व कर्मचाऱ्यांनी आपल्या समस्या राजन विचारे यांच्या निदर्शनास आणून दिल्या. राजन विचारे यांनी कोणताही (पान २ वर)

गणपती बाप्पा मोरया...

(छाया - मनोज सिंग)

अवघ्या पाच दिवसावर गणेशोत्सव आल्याने आपला लाडका गणपती घरी घेऊन जाण्यास नागरिकांनी सुरुवात केली आहे. लोकल रेल्वेतून गणपती घेऊन जाताना भाविक.

नागरी आणि पायाभूत सुविधांची कामे केल्यानंतरच १४ गावांचा नवी मुंबई महापालिकेत समावेश करावा

नवी मुंबई – कल्याण ग्रामीणच्या हद्दीमध्ये असलेली १४ गावे नवी मुंबई महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट करायचे झाल्यास अगोदर या गावांमध्ये पायाभूत आणि नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात मगच या गावांचा समावेश नवी मुंबई महापालिकेत करावा, अशी भूमिका लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी आज पत्रकार परिषदेमध्ये स्पष्ट केली आहे.

पायाभूत सुविधांसाठी सुमारे ६,१०० कोटी रुपये आणि निव्वळ गावठाणातील नागरी सुविधांसाठी सुमारे ५९१ कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित असून एमएमआरडीए किंवा अन्य प्राधिकरणांमार्फत ही कामे करावीत. यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना पत्र दिले असून निश्चितच त्यावर सकारात्मक कार्यवाही होईल असा विश्वास लोकनेते आमदार नाईक यांनी व्यक्त केला आहे. या गावांच्या नवी मुंबईत समावेशासाठी विरोध नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

■ नाईक यांचा सरकारला 'घरचा आहेर'

३१ मार्च २०२२च्या पत्राद्वारे नवी मुंबई महापालिका आयुक्तांनी शासनाचे प्रधान सचिव नगर विकास विभाग २ यांना कळविले असून त्यालाही दोन वर्षांच्या कालावधी उलटून गेल्याने या खर्चामध्ये निश्चित वाढ होणार आहे.

ठाणे जिल्ह्यातील कल्याण ग्रामीण मतदारसंघामधील दहिसर, मोकाशी, वालिवली, पिंपरी, निघू, नावाळी वाकळण बामाली, नारिवली, बाळे, नागाव, भंडार्ली, उत्तरशिव व गोठेघर या १४ गावांचा नवी मुंबई महानगरपालिकेत समावेश करावा अशी स्थानिकांची मागणी होती. १२ सप्टेंबर रोजी नगरविकास विभागाने या संदर्भातील जीआर काढला आहे. २००० साली ही चौदा गावे नवी मुंबई पालिकेत होती. मात्र, महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या कर आकारणीला विरोध करीत १४ गावांनी बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर गावांचा विकास न झाल्याने अखेर परत एकदा नवी मुंबई महानगर पालिकेच्या अखत्यारित येण्याचा निर्णय गावकऱ्यांनी घेतला. (पान २ वर)

■ केवळ १४ गावांचा अर्थसंकल्पाच्या दुप्पट भार

नवी मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मतदारसंघातील १४ गावाचा समावेश नवी मुंबई महापालिकेत करण्यात आला आहे. या गावांमधील पायाभूत सुविधांसाठी महापालिकेवर सुमारे सहा हजार कोटी रुपयांचा आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे. हा खर्च महापालिकेच्या अर्थसंकल्पाच्या दुप्पट असल्याने राज्य सरकारने भरीव आर्थिक मदत करावी, असा प्रस्ताव आता महापालिकेमार्फत तयार करण्यात आला आहे.

कल्याण तालुक्यातील दहिसर, पिंपरी, वालीवली, भंडार्ली, गोटेघर, मोकाशी, उत्तरशीव, नागाव, नेवाळी, निघु, नारीवली, बामार्ली, वाकळण, बाळे ही गावे नवी मुंबई महापालिका हद्दीत समाविष्ट करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला. या गावांमध्ये पायाभूत सुविधांची दुरावस्था आहे. या गावांचे एकूण क्षेत्र २०.८९ चौरस किलोमीटर असून एकत्रित क्षेत्रावरील पायाभूत सुविधांवर २०२२च्या दरसूचीनुसार खर्च करायचा झाल्यास महापालिकेच्या तिजोरीवर ६१०० कोटी रुपयांचा मोठा भार पडेल. निव्वळ गावठाण क्षेत्रावर पायाभूत सुविधांसाठी ५९१ कोटी रुपयांचा खर्च येऊ शकतो. हा एकत्रित खर्च ६७०० कोटींच्या घरात असून महापालिकेच्या अर्थसंकल्पापेक्षा दुप्पट असल्याचे प्रशासनाने आपल्या अहवालात म्हटले आहे. ही गावे हस्तांतरीत होत असताना अतिरीक्त निधीची आवश्यकता भासेल, असे महापालिकेने राज्य सरकारला कळविले आहे.

या गावांमध्ये बेसुमार बेकायदा बांधकामे तसेच गोदामे आहेत. मुंबईतील मीठी नदी स्वच्छता अभियानावेळी कुर्ला आणि आसपासच्या परिसरातील बेकायदा भंगार व्यावसायिकांनी शीळ-तळोजा रस्त्यावर या गावांच्या वेशीवर गोदामे थाटली आहेत. जिल्हा प्रशासनाने त्याकडे ढुंकूनही पाहीलेले नाही. महापालिका हद्दीत गावांचा समावेश करत असताना सरकारने अतिक्रमण, उपलब्ध रस्ते, सोयी सुविधांचा कोणताही अभ्यास केलेला नसून यासंबंधीचा अहवाल जिल्हा प्रशासनाने सरकारला सादर केला नसल्याची माहिती विश्वसनिय सुत्रांनी दिली.

संपादकीय...

संपादक–चंद्रकांत भोईटे

मातृसंघटना – भाजपातील मतभेदाचा मुद्दा

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाला सर्वाधिक म्हणजे २४० जागा मिळाल्या. केंद्रात सत्ता आहे, तरी भाजपाला अपेक्षित जागा मिळू शकलेल्या नाहीत. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर पक्षीय पातळीवर निकालाचे विवेचन करण्यासाठी विचारमंथनही झाले. त्याचवेळी बाहेर आरएसएसशी समन्वयाचा अभाव हे कारण असल्याची चर्चा होऊ लागली. यासंदर्भात भाजपा किंवा रास्वसंघ यांच्याकडून कोणत्याही प्रकारे समर्थन देणारी भूमिका जाहीर करण्यात आलेली नव्हती. मात्र, केरळमधील अखिल भारतीय समन्वय बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत संघाचे प्रसिद्धी प्रमुख सुनील आंबेकर यांनी पक्ष आणि मातृसंघटना यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याचे अप्रत्यक्षरीत्या मान्य केले आहे. त्यासंर्भात योग्य त्या यंत्रणेमार्फत अडचणी सोडवल्या जातील, अशी भूमिका आंबेकर यांनी मांडली आहे. या अडचणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कशाप्रकारे सोडवणार आणि त्याचे अनुकूल परिणाम पहावयास मिळणार का, हा प्रश्न अनुत्तरीत आहे. भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी निवडणुकीपूर्वी, भाजपाला पूर्वी संघाची गरज लागत होती, आता भाजपा स्वयंपूर्ण झाली आहे, अशा आशयाचे विधान केले होते. त्यामुळे आरएसएसमध्ये नाराजी असल्याची चर्चा सुरू झाली. त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपाला उत्तर प्रदेश, महाराष्ट्रात मोठा फटका बसला. पक्षाला २४० तर एनडीए मिळून २९४ चा पल्ला गाठता आला. या पार्श्वभूमीवर आरएसएसच्या नाराजीच्या चर्चांना बळ मिळत राहिले. तसेच नड्डा यांच्या वक्तव्यामुळे भाजपा आणि रास्व संघात समन्वयाचे वातावरण नाही असेही दिसून आले. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांमध्ये उलटसुलट चर्चेला उधाण आले असल्यास नवल नाही.केरळच्या पलक्कडमध्ये झालेल्या दोन दिवसीय बैठकीनंतर संघाचे प्रसिद्धीप्रमुख सुनील आंबेकर यांनी पत्रकार परिषद घेतली. यामध्ये विविध राजकीय मुद्द्यांवर त्यांनी भाष्य केले आहे. त्यावेळी भारतीय जनता पक्षासह आरएसएसशी संबंधित सर्वच संघटनांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याबाबत त्यांना विचारणा करण्यात आली. यावेळी त्यांनी समन्वयाची समस्या असल्याचे अप्रत्यक्षरीत्या मान्य करतानाच तो आमचा कौटुंबिक मुद्दा असून त्या समस्या सोडवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा काम करणार आहे, असे नमूद केले. आंबेकर यांनी समस्या सोडवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा काम करणार असल्याचे सांगितले असले तरी पक्ष आणि मातृसंस्थेच्या विचारांत फरक असल्याचे एव्हाना स्पष्ट झाले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणजे आरएसएस आता १०० वर्षं पूर्ण करत आहे. हा एका संघटनेचा दीर्घकालीन प्रवास आहे. अशा मोठ्या प्रवासांमध्ये व्यवस्थापनात्मक अडचणी येत असतात. संघाकडे अशा गोष्टींवर काम करण्यासाठी एक व्यवस्था आहे. त्यासाठी औपचारिक, अनौपचारिक बैठका होत असतात. या दीर्घकाळात निर्माण होत असलेल्या सर्व प्रश्नांवर प्रवास हेच उत्तर आहे, असे सुनील आंबेकर यांनी म्हटले आहे. प्रवास करताना अनेक संकटे येतात, त्याला वेळीच सामोरे गेले तर संकटाचे भय उरत नाही. त्याप्रमाणेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांसाठी राजकारणात जायचे असेल तर काही मापदंड किंवा संहिता आखून दिली आहे. परंतु जेव्हा रास्व संघाच्या बाहेरील कार्यकर्ते भाजपा पक्षात येतात, तेव्हा येणाऱ्यांना मातृसंघटनेच्या नियमावलींचे घेणेदेणे नसते. त्यामुळे भाजपा पक्षात दाखल होणाऱ्या नेते, कार्यकर्त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांची ओळख होण्यासाठी सातत्याने कार्यशाळा घेणे हा एक उपाय असू शकतो. या व अन्य काही उपाययोजनांची अंमलबजावणी रास्व संघाने केली तर मातृसंघटना आणि त्यांचा राजकीय पक्ष यांच्या विचारशैलीत एकवाक्यता होण्याची शक्यता आहे. तरीही जे. पी. नड्डा यांच्या स्वयंपूर्णतेच्या विधानानंतर निर्माण झालेली समन्वयाची अडचण आणि त्यानंतर लोकसभा निवडणुकांदरम्यान आरएसएसच्या कॅडरच्या उत्साहात जाणवलेली कमतरता यावर बैठकीत चर्चा झाल्याचे सूतोवाच आंबेकर यांनी दिले आहे. इतर समस्याही लवकरच सोडवल्या जातील. तो आमचा कौटुंबिक प्रश्न आहे. तीन दिवसांच्या बैठकीत प्रत्येकाने सहभाग घेतला होता. सर्व काही ठीक चालू आहे, असे आंबेकर सांगायला विसरले नाहीत. संघ–भाजपातील संभाव्य मतभेदाबाबतच्या प्रश्नांना यशस्वीपणे उत्तरे देतानाच आंबेकर यांनी एकदाही दोन्हींमधील समन्वयाच्या अभावाचा मुद्दा नाकारलेला नाही, हे विशेष आहे. दोन्ही संघटनांमध्ये काही अडचणी असल्याचे पहिल्यांदाच संघाने जाहीरपणे मान्य केल्याचे दिसून आले आहे. यातील दिलासादायक बाब ही की, आंबेकरांनी म्हटले आहे, आरएसएस व भारतीय जनता पक्ष या संघटना त्यांच्या मूलभूत विचारसरणी व त्यावरील श्रद्धा याबाबत एकाच विचारावर विश्वास ठेवणाऱ्या असाव्यात. हेही नसे थोडके ! आरएसएसच्या सदर बैठकीमध्ये भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा सहभागी झाले होते व त्यांनी यादरम्यान, आरएसएसच्या अनेक उच्चपदस्थांच्या भेटीही घेतल्या. नड्डा यांनी केलेल्या त्या विधानानंतर पहिल्यांदाच ते आरएसएसच्या उच्चपदस्थांना भेटत होते. यावेळी त्यांनी सरसंघचालक मोहन भागवत यांचीही भेट घेतली. आगामी काळात भाजपाला अवघड अशा हरियाणा, जम्मू–काश्मीर, झारखंड व महाराष्ट्र या राज्यांमधील विधानसभा निवडणुकांना सामोरे जायचे आहे. त्यामुळे संघ व पक्षामधील हे मतभेद त्याआधीच संपुष्टात येणे भाजपासाठी महत्त्वाचे आहे. त्यामुळे दोघांनी समन्वयाने निवडणुकांना सामोरे जाताना काही संहिता बाळगली पाहिजे असे वाटते.

जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'

☆ मिळकट नोटीस
☆ हस्तांतर करार नोटीस
☆ नोंदणी न्यास नोटीस
☆ निविदा जाहिरातीसाठी
☆ तहसिल जाहीरनामा
☆ कामगार न्यायालय नोटीस

- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क : दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४, कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
☎ 022 - 25379944 , +91 - 9167957771

* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यात राहिल.)

महाराष्ट्र सम्राट
*DISCLAIMER: Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी दिलेला वारसा आपण जपला पाहिजे

ठाणे – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य जनकल्याणासाठी समर्पित केले. अनेक लोकपोयोगी कमी केली त्यामुळे त्यांनी आपल्याला दिलेला वारसा आपण जपला पाहिजे असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या वंशज ॲड. रुचिका शिंदे यांनी ठाणे येथे केले.

धनगर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य व धनगर प्रतिष्ठान महिला मंडळ, ठाणे यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त ठाणे शहरातील दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव कार्यक्रम ठाण्यातील मासुंदा तलाव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे रुचिका शिंदे प्रमुख पाहुणे होते. याप्रसंगी ठाणे शहरातील दहावी व बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा भेटवस्तू आणि प्रशस्तीपत्र देऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या सासरच्या वंशज ॲड. रुचिका शिंदे व माहेरचे वंशच प्रफुल्ल शिंदे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी उद्योजक शंकर कोळेकर,समाजाचे ज्येष्ठ दिलीप कवितके, बाबासाहेब दगडे,भीमराव जानकर,निलेश खताळ, प्रतिष्ठानचे अध्यक्ष दीपक कुरकुंडे,महिला मंडळाचे अध्यक्षा माधवी बारगीर, प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष महेश गुंड, सचिव तुषार धायगुडे ,खजिनदारअनिल जरग ,सल्लागार प्रसाद वारे, सूर्यकांत रायकर,सुनील राहिंज कार्यकारणी सदस्य गणेश बारगीर,सुरेश भांड,राजेश वारे,उत्तम यमगर,संतोष बुधे,संतोष दगडे,उद्धव गावडे,महेश पळसे,प्रवीण शेंडगे,रमेश गलांडे, धनगर प्रतिष्ठान महिला मंडळाच्या सचिव गायत्री गुंड,खजिनदार भारती पिसे,सुषमा बुधे,सीमा कुरकुंडे,सुजाता भांड, स्मिता गावडे आदी उपस्थित होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी संपूर्ण देशात विविध ठिकाणी मंदिराचा जिणोध्दार केला,रस्ते बांधले,बारव उभारल्या,नदी घाट बांधले,अन्नधत्र उभे केले असे लोकपयोगी कमी केली.त्यांनी संपूर्ण आयुष्य जनकल्याणासाठी समर्पित केले.त्यामुळे त्यांनी आपल्याला दिलेला वारसा आपण जपला पाहिजे असे मार्गदर्शन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या वंशज ॲड. रुचिका शिंदे यांनी उपस्थितांना केले. त्याकाळी कोणताही प्रकराची साधन सामुग्री उपलब्ध नसताना देखील पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी केलेले कार्य एक आदर्श आहे.त्यामुळे विद्यार्थ्यांनी देखील याची माहिती करून घेतली पाहिजे आणि त्यांचे विचार अनुकरण केल्यास त्यांनादेखील त्यांचा पुढील आयुष्यात त्याचा नक्कीच फायदा होईल असे यावेळी ॲड. रुचिका शिंदे म्हणाल्या.

अहिल्यादेवी होळकर यांच्या वंशज ॲड. रुचिका शिंदे

समाजासाठी काम करणाऱ्या अनेक संस्था आहेत परंतु समाज पुढे गेला पाहिजे यासाठी झटणारी एकमेव संस्था धनगर प्रतिष्ठान असल्याचे गौरव उद्गार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या माहेरचे वंशज प्रफुल्ल शिंदे यांनी काढले धनगर समाजासाठी नवनवीन कार्यक्रम राबवून समाजाला एकत्रित करण्याचे कार्य कौतूकास्पद असल्याचे ना. शिंदे यांनी सांगितले.

महाराष्ट्राचा सुखकर्ता व Reel To रिअल महाराष्ट्र या रील स्पर्धेचे आयोजन

(पान १ वरून) पारितोषिक या स्पर्धेच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मुंबई येथील चर्नीरोड येथे या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. मुख्यमंत्री महोदय यांनी युवकांना प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केल्याबद्दल पुर्वेश सरनाईक यांचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री आणि महायुती सरकारने हिंदू सणावरील बंदी ही पूर्ण उठवली आहे. गणपती उत्सव हा मुंबई, ठाणे मर्यादित न राहता संपूर्ण राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात व्हावा या दृष्टीकोनातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे असे पुर्वेश सरनाईक यांनी सांगितले.

शिवसेनेच्या वतीने शोध महाराष्ट्राच्या रत्नांचा या स्पर्धेचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते १ सप्टेंबर रोजी करण्यात आला. यात महाराष्ट्राचा सुखकर्ता राज्यस्तरीय गणपती सजावट स्पर्धा आणि Reel To Real महाराष्ट्र राज्यस्तरीय रील स्पर्धेची घोषणा मुख्यमंत्री महोदयांनी केली .

Reel To Real महाराष्ट्र ही राज्यस्तरीय रील स्पर्धा ८ विभागात होईल. पहिले पारितोषिक १ लाख व आयफोन, द्वितीय पारितोषिक ७५ हजार व आकर्षक ट्रॉफी, तृतीय पारितोषिक ५० हजार व आकर्षक ट्रॉफी, चौथे पारितोषिक २५ हजार व आकर्षक ट्रॉफी आणि या बरोबर विजेत्यांना १० हजार व आकर्षक ट्रॉफी देण्यात येणार आहे.

भविष्य निधी कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या समस्या राजन विचारे यांनी आयुक्तांकडे मांडल्या

(पान १ वरून) विलंब न लावता तात्काळ ठाणे उत्तर विभागाचे क्षेत्रीय भविष्य निधी आयुक्त नंदकुमार आडुळकर व दक्षिण विभागाचे क्षेत्रीय भविष्य निधी आयुक्त कुणाल ठाकूर यांची भेट घेऊन कर्मचाऱ्यांच्या समस्या त्यांच्यासमोर मांडल्या. त्यावेळी त्यांना ठणकावून सांगितले की ठाणे व त्याच्या शेजारील इतर शहरातील नागरिकांना आपल्या नोकरीतील पी एफ मिळवण्यासाठी अपुऱ्या असणाऱ्या सुविधामुळे वारंवार हेलपाटे मारावे लागतात. पीएफ कार्यालयात जी पद्धत वापरली जाते ती अतिशय जुनी आणि कालबाह्य असल्याकारणाने संपूर्ण देशातल्या पीएफ कार्यालयात त्याचे परिणाम होत आहेत. तरी सुद्धा वरिष्ठ अधिकारी कामाचे टार्गेट देऊन सुट्टीच्याही दिवसाला काम करावयास लावत आहेत. त्यामुळे येथील कर्मचाऱ्यांना सुविधा व्यवस्थित पुरवल्यास कर्मचारी आपली कामे चोख बजावू शकतात. या सिस्टिमचे आपण मॅनेजमेंट करत आहात जर सिस्टमच तुम्ही आधुनिक करत नसाल तर सिस्टम कशी काम करणार असा सवाल त्यांना केल्यानंतर त्यांच्या समस्या लवकरच निवारण करून देण्याचे आश्वासन आयुक्त यांनी शिवसेना नेते माजी खासदार राजन विचारे यांना दिले आहे. त्यावेळी कार्याध्यक्ष अभय कुमार, उपाध्यक्ष नरेंद्र सिन्हा, सरचिटणीस विजय ठाकरे, क्षेत्रीय उपाध्यक्ष मनोज कुमार, व इतर कर्मचारी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नागरी आणि पायाभूत सुविधांची कामे केल्यानंतरच १४ गावांचा महापालिकेत समावेश करावा...

(पान १ वरून) उत्तरेकडून येताना ठाणे महापालिकेची हद्द ओलांडून आणि पनवेल महापालिकेची हद्द ओलांडून या गावांमधून नवी मुंबई महापालिका क्षेत्रात यावे लागते. या गावांचे क्षेत्र कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रात येत असल्याने महापालिकेची हद्द ऐरोली, बेलापूर यासह कल्याण ग्रामीण अशा तीन विधानसभा क्षेत्रात विभागली जाणार आहे तसेच या गावांमधील पायाभूत सुविधांवर शेकडो कोटी रुपयांचा खर्च येणार असून त्याचा आर्थिक भार नवी मुंबई महापालिकेवर पडणार आहे. या १४ गावांमधील अनधिकृत भंगाराची गोदामे तसेच शासकीय जागांवरील अतिक्रमणे बांधकामे झोपडपट्ट्या याबाबत स्पष्टता नाही १४ गावांमधील रस्ते पाणी दिवाबत्ती इत्यादी पायाभूत सुविधांवर नवी मुंबईकरांच्या कररुपी पैशांचा वापर न करता पायाभूत संविधावर होणारा खर्च एमएमआरडीए अथवा इतर प्राधिकरणामार्फत करण्यात यावा. मार्च २०२२ मध्ये विधानसभा सभागृहामध्ये या विषयावर चर्चा करताना देखील लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी या गावांचा पालिकेत समावेश करण्याअगोदर आडवली भूतवली येथून पारसिकच्या डोंगरातून एक बोगदा काढून या १४ गावांना नवी मुंबईला जोडणारा रस्ता तयार करावा अशी मागणी केली आहे. सदर १४ गावांमधील पायाभूत सुविधांची मोठ्या प्रमाणावर दुरावस्था झालेली असून त्या अनुषंगाने प्रथम काम व्हायला पाहिजे. नवी मुंबई महापालिकेने अटी आणि शर्तींचा समावेश करून जो ठराव राज्य शासनास सादर केला आहे व नवी मुंबई महापालिका आयुक्तांनी ३१ मार्च २०२२ रोजी अपेक्षित खर्चाबाबत शासनाला पत्र सादर केले आहे त्याची पूर्तता केल्यानंतरच गावांच्या समावेशाबाबतचा अंतिम निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री महोदयांना पाठवलेल्या पत्रात केली आहे. पत्रकार परिषदेला माजी महापौर सागर नाईक, महापालिकेचे माजी सभागृहनेते रवींद्र इथापे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत स्थायी समितीचे माजी सभापती नवीन गवते, माजी नगरसेवक सुरज पाटील, माजी परिवहन समिती सदस्य वीरेश सिंग आदी मान्यवर उपस्थित होते.

पुण्यात कौटुंबिक वादातून माजी नगरसेवक वनराज आंदेकरांची हत्या

(पान १ वरून) वनराज आंदेकर यांचे वडील बंडू उर्फ सूर्यकांत आंदेकर कुख्यात गुंड आहे. पुण्यामधील नाना पेठेतील आंदेकर यांची टोळी प्रसिद्ध आहे, या टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर. बंडू आंदेकर याला जन्मठेपेची शिक्षा झाली आहे. मात्र जानेवारीमध्ये तो जामीनावर बाहेर आलाय. बंडू आंदेकर याला एक मुलगा आणि दोन मुली आहेत. संपत्तीच्या वादातूनच वनराज यांची हत्या झाली. वनराज आंदेकर यांची हत्या करण्याचा प्लॅन त्यांच्याच दोन बहिणी आणि मेहुण्यांनी केला. पुण्याचे शहर आयुक्त रंजन कुमार शर्मा यांनी वनराज आंदेकर यांचे मेहुणे जयंत कोमकर, गणेश कोमकर आणि बहिणी संजीवनी कोमकर आणि कल्याणी कोमकर यांना या हत्या प्रकरणात अटक केल्याची माहिती दिली आहे.

गणेशोत्सवनिमित्त ठाण्यातील बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात इको फ्रेंडली मकर विक्रीसाठी आले आहेत. (छाया, मनोज सिंह)

गणपती बाप्पा मोरया...

अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवासाठी बाजारपेठाही सज्ज झाल्या असुन नागरिकांची झुंबड उडत आहे. सोमवारी अचानक बरसलेल्या पावसात देखील नागरिकांनी खरेदीचा आनंद लुटला. गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या सजावटीच्या साहित्यापासून ते पूजेच्या साहित्यापर्यंत सर्वच गोष्टी खरेदी करताना ग्राहकवर्ग.... (छाया, मनोज सिंह)

जाहीर नोटीस

तमाम जनतेला या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशील श्रीमती प्रिया विजय घैसास हिंदू भारतीय सज्ञान विधवा सेवानिवृत्त यांचे वतीने तमाम जनतेला कळवू इच्छितो की त्या सध्या सदनिका क्रमांक बी १०२ रौनक टॉवर्स को–ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी मर्यादित, बी पी देशपांडे पथ, ऑफ गोखले रोड नौपाडा ठाणे (पश्चिम) ४००६०२ या ठिकाणी राहत आहे (यापुढे सदर सदनिका असा उल्लेख आल्यास व वेगळा उल्लेख नसल्यास वर वर्णन केलेली सदनिका समजावी). आमचे अशिलांचे वतीने आम्ही पुढे करू इच्छितो की सदर सदनिका ही त्यांच्या यजमानानी त्यांच्या सासूबाईंनी म्हणजे श्री विजय भिकाजी घैसास व श्रीमती लीला भिकाजी घैसास यांनी विकासाकाकडून विकत घेतली होती. आमच्या अशिलांच्या यजमानांचे म्हणजे श्री विजय भिकाजी घैसास यांचे दिनांक २८ ऑक्टोबर २०२१ रोजी निधन झाले तर माझ्या सासूबाईंचे म्हणजे श्रीमती लीला भिकाजी घैसास यांचे ५ ऑगस्ट २०१६ रोजी निधन झाले त्या अगोदरच श्री भिकाजी घैसास यांचे निधन झालेले होते. आमच्या अशीलाना एक मुलगा होता त्याचे नाव ओंकार असे होते त्याचे देखील दिनांक ११ डिसेंबर २०१० रोजी अपघाती निधन झाले तो अविवाहित होता आमच्या अशीलांच्या सासूबाईंना त्यांचे यजमान धरून आणखी दोन वारस होते आहेत त्यांची नावे पुढीलप्रमाणे १) श्री विजय भिकाजी घैसास मयत २) सौ सुजाता सुरेश कामत(नलिनी भिकाजी घैसास) मयत ३) श्रीमती वर्षा वसंत करमरकर (पूर्व आश्रमाची शालिनी भिकाजी घैसास) यापैकी श्री विजय भिकाजी घैसास यांना आमचे अशिल हे एकमेव वारस आहेत. तर श्रीमती सुजाता सुरेश कामत यांच्या वारसांनी म्हणजेच त्यांच्या पतीने आणि त्यांच्या मुलीने व श्रीमती वर्षा वसंत करमरकर यांनी सदर सदनिकेवरील आपला हक्क हक्क सोड पत्र करून आमचे अशिलांचे लाभात सोडून दिला आहे त्यामुळेच आमच्याशी या सदर सदनिकेच्या पूर्णपणेमालक झालेया आहेत. याशिवाय रौनक टॉवर को–ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी मर्यादित या संस्थेचे नावाने इमारतीचे व भूखंडाचे खरेदीखत देखील झाले आहे त्यात आमच्या अशीलांचे व त्यांच्या पतीचे नाव देखील असून त्याने आवश्यक ते मुद्रांक शुल्क देखील भरलेले आहे. सदर खरेदी खतात चुकीने आमच्या अशीलांचे नाव श्रीमती प्रिया भिकाजी घैसास असे नोंदले गेले असले तरी ते प्रत्यक्षात श्रीमती प्रिया विजय घैसास असे आहे. तशा अर्थाचे प्रतिज्ञापत्र देखील आमच्या अश्लील आणि बनवले आहे. सदर सदनिकेच्या अनुषंगाने आमच्या अशीलनी एक नोंदणीकृत मृत्युपत्र देखील बनवले आहे. सदर सदनिकेचा ताबा हा त्यांच्याकडे असून त्याचा उपभोग मर्जीप्रमाणे घेत आहेत असे जरी असले तरी भविष्यात कोणतीही समस्या उभी राहू नये म्हणून आमचे अशील या जाहीर नोटेषद्वारे तमाम जनतेमधून त्यांच्या मालकी हक्काला अथवा त्यांचे नाव चुकीने खरेदी खतात मोजले आहे त्याला हरकती असल्यास त्या मागवत आहेत.

तरी सदर सदनिका आमच्या अशिलांच्या पूर्णपणे मालकीची असल्याबद्दल तसेच त्यांचे नाव संस्थेच्या खरेदीखतात चुकीचे नोंद झाले या अनुषंगाने काही हरकती असल्यास तसेच सदर मालमत्तेवर कसले हक्क उदाहरणार्थ तारण, गहाण, दान, पोटगी, बोजा इत्यादी असतील तर त्यासंबंधी काही लेखी म्हणणे सादर करायचे असेल तर ते कागदोपत्री पुराव्यासह पुढील पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सादर करावे विहित मुदतीनंतर सादर झालेल्या हरकती दाव्यांची दखल घेतली जाणार नाही. तसेच सदर हक्क संबंधितानी स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल व सदर सदनिका आमच्या अशिलांच्या नावे हस्तांतरित करण्याची कारवाई पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी यासंबंधी हरकती व आपले लेखी म्हणणे मांडण्यासाठीचा पत्ता पुढे दिला आहे.

सही/–
श्रीनिवास भार्गव राम घैसास
वकील उच्च न्यायालय व नोटरी भारत सरकार

परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका

ई- निविदा सुचना

परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका ठाणे मायकोचे अधिकृत सर्व्हिस सेंटर यांचेकडून बसेसचे बॉशपंप दुरुस्ती आणि रिपेअरींगच्या कामाकरीता ई टेंडरिंग पध्दतीने ऑन लाईन निविदा मागविण्यात येत आहे. सदरील निविदा सुचना व निविदा फॉर्म शासनाच्या https:// mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.०३/ ०९/ २०२४ पासुन दि.११/०९/२०२४ रोजी १५.०० वाजेपर्यत उपलब्ध होतील सदरच्या निविदा दि.११/०९/२०२४ रोजी १५.०० वाजेपर्यत स्विकारल्या जातील. व शक्य झाल्यास दि.१३/०९/ २०२४ रोजी १५.०० वाजेपर्यत उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/परिवहन/४०९/२०२४-२५ सही/-
दि.०२.०९.२०२४ परिवहन व्यवस्थापक
PLS VISIT OUR OFF. WEBSITE परिवहन सेवा,ठा.मपा.ठाणे
www.thanecity.gov.in

ठाणे महानगरपालिका, ठाणे

सा.बां.विभाग
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका, ठाणे अनुभवी ठेकेदारांकडून "ठाणे महानगर पालिकेच्या हद्दीतील दादोजी कोंडदेव क्रिडाप्रेक्षागृह येथील खंडू रांगणेकर बॅडमिंटन हॉलचे Extension करणे" या कामासाठी ई-निविदा पध्दतीने ऑनलाईन निविदा मागवित आहे. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय/ निमशासकिय/सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली/सुरु आहे, अशा कंत्राटदारांना सदर निविदा प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही.कामाची सविस्तर निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत संकतेस्थळ https://mahatenders.gov.in येथे दि.०३/०९/२०२४ ते दि.१८/०९/२०२४ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील.सदर निविदा ई-टेंडरींग पध्दतीने दि.१८/०९/२०२४ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि.१९/०९/२०२४ रोजी १६.३० वाजता उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/४०७/२०२४-२५ सही/-
दि:०२.०९.२०२४ नगरअभियंता
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in

ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका,अनुभवी निविदाकारांकडुन "अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रविकास कार्यक्रम " अंतर्गत ठाणे १४८ विधानसभा क्षेत्र मधील ठाणे महानगपालिका प्रभाग क्र २२ मध्ये पेव्हर ब्लॉक व विवध स्थापत्य कामे करणेसाठी चार कामांकरीता ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागवित आहे. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय/निमशासकिय/सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली/सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत ई-निविदा संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/ येथे दि.०३/०९/२०२४ ते दि. १०/०९/ २०२४ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई-टेंडरींग पध्दतीने दि. १०/०९/२०२४ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि. ११/०९/२०२४ रोजी १६.३० वा उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/सा.बा/४०२/२०२४-२५ सही/-
दि.०२.०९.२०२४ कार्यकारी अभियंता
Pls visit our oficial web-site ठाणेमहानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in

भारतीय रेल्वे

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

सभासद व्हा ....आणि
दररोज नोकऱ्यांची माहिती आपल्या मोबाईलवर थेट मिळवा
वार्षिक वर्गणी फक्त 450/-
संपर्क : 9892305888

■ पदाचे नाव :
१ डायटीशियन
२ नर्सिंग सुपरिटेंडेंट
३ ऑडिओलॉजिस्ट स्पीच थेरेपिस्ट
४ क्लिनिकल सायकोलॉजिस्ट
५ डेंटल हाइजीनिस्ट
६ डायलिसिस टेक्निशियन
७ हेल्थ मलेरिया इंस्पेक्टर ग्रेड III
८ लॅब सुपरिटेंडेंट ग्रेड III
९ पर्फ्युजनिस्ट
१० फिजियोथेरेपिस्ट ग्रेड II
११ ऑक्यूपेशनल थेरेपिस्ट
१२ कॅथ लॅब टेक्निशियन
१३ फार्मासिस्ट
१४ रेडिओग्राफर एक्स-रे टेक्निशियन
१५ स्पीच थेरपिस्ट
१६ कार्डियाक टेक्निशियन
१७ ऑप्टोमेट्रिस्ट
१८ ECG टेक्निशियन
१९ लॅब असिस्टंट ग्रेड II
२० फील्ड वर्कर
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: B.Sc + डायटीशियन PG डिप्लोमा किंवा B.Sc (Home Science) + M.Sc Home Science (Food and Nutrition)
पद क्र.२: GNM² किंवा B.Sc (Nursing)
पद क्र.३: B-SLP
पद क्र.४: पदव्युत्तर पदवी (Clinical Psychology / Social Psychology)
पद क्र.५: (i) B.Sc (Biology) (ii) डेंटल हाइजीन डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: B.Sc.+डिप्लोमा (Haemodialysis) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) B.Sc.(Chemistry) (ii) हेल्थ / सॅनिटरी इंस्पेक्टर डिप्लोमा किंवा NTC (Health Sanitary Inspector)
पद क्र.८: B.Sc (Bio-Chemistry / Micro Biology / Life science)+DMLT किंवा B.Sc (Medical Technology)
पद क्र.९: B.Sc + डिप्लोमा (Perfusion Technology) किंवा B.Sc + ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) फिजिओथेरेपी पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) १२वी उत्तीर्ण (ii) ऑक्यूपेशनल थेरेपी डिप्लोमा/पदवी
पद क्र.१२: B.Sc+ डिप्लोमा (Cardiac Professional Cath Lab work) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१३: १२वी उत्तीर्ण+D.Pharm किंवा B.Pharma
पद क्र.१४: १२वी उत्तीर्ण (PhysicsChemistry) (ii) डिप्लोमा (Radiography/ X Ray Technician/ Radiodiagnosis Technology)
पद क्र.१५: (i) B.Sc (ii) डिप्लोमा (Audio and Speech Therapy) (iii) २ वर्षे अनुभव
पद क्र.१६: १२वी (Science) उत्तीर्ण किंवा डिप्लोमा (Cardiology Lab)
पद क्र.१७: B.Sc (Optometry) किंवा (Ophthalmic Technician)
पद क्र.१८: (i) १२वी उत्तीर्ण /B.Sc (ii) डिप्लोमा/पदवी (ECG Laboratory Technology / Cardiology /Cardiology Technician / Cardiology Techniques)
पद क्र.१९: (i) १२वी उत्तीर्ण (ii) DMLT
पद क्र.२०: १२वी उत्तीर्ण (Biology/ Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१,४,५,७,८,१०, ११, १२, १५ ते १९: १८ ते ३६ वर्षे
पद क्र.२: २० ते ४३ वर्षे
पद क्र.३: २१ ते ३३ वर्षे
पद क्र.६: २० ते ३६ वर्षे
पद क्र.९: २१ ते ४३ वर्षे
पद क्र.१३: २० ते ३८ वर्षे
पद क्र.१४: १९ ते ३६ वर्षे
पद क्र.२०: १८ ते ३३ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST/ExSM²/ /EBC/महिला: २५०/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत संकेतस्थळ https://indianrailways.gov.in/

भारतीय सर्वोच्च न्यायालय

■ जागा : ८० जागा
■ पदाचे नाव:
१ ज्युनियर कोर्ट अटेंडंट (स्वयंपाकाचे
■ शैक्षणिक पात्रता: (i) १०वी उत्तीर्ण (ii) पाककला डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते २७ वर्षे SC/ ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: दिल्ली
■ Fee: General/OBC: ४००/- SC/ST/PWD/ExSM²: २००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १२ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.sci.gov.in/

केंद्रीय लोकसेवा आयोग

■ पदाचे नाव :
१ डेप्युटी सुपरिटेंडिंग आर्कियोलॉजिस्ट ६७
२ केबिन सेफ्टी इंस्पेक्टर १५
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) पदव्युत्तर पदवी (Archaeology/Indian History/- nthropology) (ii) PG डिप्लोमा/ एडवांस डिप्लोमा (Archaeology) किंवा ०३ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) १२वी उत्तीर्ण (ii) केबिन क्रू म्हणून दहा वर्षांचा अनुभव आणि सध्या केबिन क्रू म्हणून कार्यरत.
■ वयाची अट: ०५ सप्टेंबर २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ३५ वर्षांपर्यंत
पद क्र.२: ४० वर्षांपर्यंत
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: २५/- SC/ST/PH/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ सप्टेंबर २०२४ (११:५९ PM²)
■ अधिकृत वेबसाईट https://upsc.gov.in/

उत्तर रेल्वे

■ पदाचे नाव :
१ अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी) ४०९६
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
■ वयाची अट: १६ सप्टेंबर २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: उत्तर रेल्वे
■ Fee: General/OBC: १००/- SC/ST/PWD/महिला: फी नाही
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://nr.indianrailways.gov.in/

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडून

उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४ चे आयोजन

ठाणे : दि.०७ सप्टेंबर २०२४ पासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवात राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या शासन स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलिसांकडे परवानगी घेतलेल्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येणार आहे.

शासनाने निश्चित केलेल्या निकषाच्या आधारे पुरस्कारासाठी निवड करण्यात येणार आहे. शासनाने ठरविलेल्या निकषांची पूर्तता करणाऱ्या किंवा करु शकणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनीच स्पर्धेसाठी अर्ज करावयाचा असून अर्जाचा नमुना, गुणांकनाचे निकष, आवश्यक कागदपत्रे, फोटो व व्हिडीओबाबत तपशील पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि.३१ जुलै २०२४ च्या शासन निर्णयामध्ये दिला आहे. (हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी स्पर्धेसाठीचे परिपूर्ण अर्ज प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई यांच्या mahotsav.pldagmail.com या ई-मेलवर दि.३१ ऑगस्ट २०२४ पूर्वी ऑनलाईन सादर करावयाचे आहेत.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून प्राप्त झालेले जिल्हानिहाय अर्ज प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास दि.०५ सप्टेंबर २०२४ पूर्वी उपलब्ध करुन देतील.

जिल्हास्तरीव निवड समिती प्रत्येक गणेशोत्सव मंडळास अभिप्रायासह गुणांकन देईल. जिल्हास्तरीय समिती मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे या ४ जिल्ह्यातून प्रत्येकी ३ व अन्य जिल्ह्यातून प्रत्येकी १ उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळाची शिफारस प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे कला अकादमी यांच्यामार्फत ई-मेलद्वारे राज्यस्तरीय निवड समितीकडे करेल.

राज्यस्तरीय समिती प्राप्त शिफारशीत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमधून गुणांकन व संबंधित कागदपत्रांच्या आधारे पहिल्या ३ विजेत्यांची निवड करतील. राज्यस्तरीय पहिल्या ३ विजेत्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येईल.

पारितोषिकांची रक्कम पुढीलप्रमाणे-
प्रथम क्रमांक रु.५.०० लक्ष, द्वितीय क्रमांक रु.२.५ लक्ष, तृतीय क्रमांक रु.१.०० लक्ष.

वरीलप्रमाणे ३ विजेत्या गणेशोत्सव मंडळांना वगळून उर्वरित ४१ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांस राज्य शासनाकडून प्रत्येकी रु.२५ हजार चे पारितोषिक व प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात येईल, अशी माहिती ठाणे जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हास्तरीय गणेशोत्सव समितीचे सदस्य सचिव वैभव कुलकर्णी यांनी दिली आहे.

केंद्र व राज्य शासनाचे स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत

वोक्हार्ट सायक्लोन २०२४

भाईंदर : मिरा-भाईंदर महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांच्या विशेष मार्गदर्शनाने माझी वसुंधरा आणि स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत वोक्हार्ट हॉस्पिटलच्या सहकार्याने जागतिक हृदय दिवसानिमित्त ३० आणि १५ किलोमीटर लांबीचे वोक्हार्ट सायक्लोन २०२४ याचे आयोजन केलं होतं. यावर्षीचे हे सलग ३ वर्ष होते.

मिरा-भाईंदर शहरातील जवळजवळ १३०० सायकलस्वारांनी या वोक्हार्ट सायक्लोनला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आनंदाने सहभाग घेतला. सायकलिंग हे प्रदूषण कमी करणारे आणि निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देणारे एक टिकाऊ, पर्यावरणपूरक वाहतूक साधन आहे म्हणूनच तिच्या माध्यमातून मिरा-भाईंदर शहराला हृदयाच्या बाबतीत जागृती करण्याचा हा एक प्रयत्न करण्यात आला.

वोक्हार्ट सायक्लोन २०२४ चा मार्ग वोक्हार्ट हॉस्पिटलपासून सुरु होऊन तिथेच संपला होता. या मार्गामध्ये मॅक्सस मॉल, उत्तन सर्कल, आणि गोराई क्रॉस चौक यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणांचा समावेश होता. हे १५ किमी आणि ३० किमीचे सायकलिंग इव्हेंट केवळ हृदयाच्या आरोग्यासाठीच नव्हे तर केंद्र व राज्य शासनाचे स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियानयात सायकल चालविणे बाबत पर्यावरण पूरक जनजागृती करणे व जास्तीत

जास्त सायकल च वापर करून पर्यावरणाचा समतोल राखणे हा देखील उद्देश होता.

मिरा भाईंदर चे आयुक्त यांनी स्वतः सायकल चालवत या वोक्हार्ट स सायक्लोन २४ चे प्रतिनिधित्व केल्यामुळे सगळ्या सायकलस्वारांमध्ये एक वेगळाच उत्साह आणि आनंद होता. आयुक्तांच्या समवेत उपायुक्त सचिन बांगर, उपायुक्त (मुख्यालय) संजय दोंदे, उपायुक्त प्रसाद शिंगटे, सहाय्यक आयुक्त योगेश गुनिजन, स्वच्छता सर्वेक्षण २०२४ चे ब्रॅण्ड ॲम्बेसेडर अभिनेत्री दिपीका सिंग तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक, इतर पदाधिकारी आणि कर्मचारी यांनी हि सायकल चालवत या वोक्हार्ट सायक्लोन २०२४ मध्ये आपला लक्षणीय सहभाग नोंदवला.

मिरा भाईंदर शहरातील लोकांमध्ये हृदय आणि त्या संदर्भातील आजाराची जनजागृती व्हावी आणि कमीत कमी लोकांना हृदयरोगाचा सामना करावा लागवा आणि शहरातील प्रत्येक नागरिक सुदृढ सशक्त असावा एवढी मापक अपेक्षा या नियोजना मागे होती.

मिरा-भाईंदर महापालिकेने आयोजित या वोक्हार्ट सायक्लोनमध्ये दरवर्षी अशीच सायकलस्वारांची भर पडत राहो आणि मिरा-भाईंदर शहरात सोबतच भारताच्या प्रत्येक नागरिकांचे हृदय सुदृढ राहून त्यांना निरोगी आयुष्य लाभत देश विकासाच्या आणि प्रगतीच्या दिशेने जावो अशा मनस्वी शुभेच्छा मा.आयुक्तांनी जमलेल्या सगळ्या जनसमुदायाला दिल्या.

मुंबईमध्ये हिवताप, डेंग्यू, चिकुनगुन्या, लेप्टोच्या रुग्णांमध्ये वाढ

मुंबई : पावासाळ्यात साथीच्या आजारांमध्ये वाढ होत असली तरी जून व जुलैच्या तुलनेत मुंबईमध्ये हिवताप, डेंग्यू, चिकूनगुन्या व लेप्टोच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. स्वाईन फ्लू व कावीळच्या रुग्णांमध्ये फारशी वाढ झालेली नाही तर गॅस्ट्रोच्या रुग्णांमध्ये लक्षणीय घट झाली आहे.

पावसाळा सुरू होताच गॅस्ट्रोच्या रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. त्याखालोखाल हिवताप व डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली होती. जून व जुलैमध्ये या आजारांच्या रुग्णांमध्ये सातत्याने वाढ होत होती. मात्र जुलैमध्ये स्वाईन फ्लूने अचानक डोके वर काढले. जुलैमध्ये जोरदार झालेल्या पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचण्याच्या घटना वाढल्या. परिणामी साचलेल्या पाण्यातून नागरिकांना प्रवास करावा लागला. त्यामुळे लेप्टोचे रुग्णही वाढू लागले. त्यामुळे गॅस्ट्रो, हिवताप, डेंग्यूपाठोपाठ लेप्टो व स्वाईन फ्लूच्या रुग्णांमध्ये वाढ झाली. मात्र ऑगस्टमध्ये अधूनमधून होत असलेला पाऊस व वाढते ऊन यामुळे हिवताप, डेंग्यू व लेप्टोच्या रुग्णांबरोबरच चिकुनगुन्याच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. मुंबईत हिवतापाचे ११७१ रुग्ण, डेंग्यूचे १०१३ रुग्ण, लेप्टोचे २७२ रुग्ण, चिकूनगुन्याचे १६४ रुग्ण, कावीळ १६९ आणि स्वाईन फ्लूचे १७० रुग्ण सापडले आहेत. मात्र गॅस्ट्रोच्या रुग्णांच्या संख्येत घट झाली असून, गॅस्ट्रोचे ६९४ रुग्ण सापडले आहेत.

अंबरनाथ गोळीबारातील दोन जण डोंबिवलीतील घारिवलीत अटक

कल्याण : अंबरनाथ येथील एमआयडीसीत दोन वर्षापूर्वी झालेल्या गोळीबार प्रकरणातील दोन फरार आरोपींना कल्याण गुन्हे शाखेच्या पथकाने डोंबिवली जवळील घारिवली गावातून अटक केली आहे. मोक्का अंतर्गत कारवाई झालेल्या या दोन्ही आरोपींच्या शोधासाठी पोलिसांनी विविध भागात शोधकार्य सुरू ठेवले होते. अखेर हे दोन्ही गुन्हेगार कल्याण गुन्हे शाखेच्या पोलिसांना सापडले.

किरण अशोक गायकवाड (३५, रा. देसलेपाडा, भोपर रोड, डोंबिवली), दिपेश तुळशीराम जाधव (३०, रा. अडवली खुर्द, डोंबिवली) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

दोन वर्षापूर्वी अंबरनाथमध्ये बेधुंद गोळीबार करून फरार झालेले दोन गुन्हेगार डोंबिवली जवळील घारिवली गाव हद्दीतील रुणवाल गार्डन गृहसंकुल भागात एकमेकांना गुप्तपणे भेटण्यासाठी येणार आहेत अशी गुप्त माहिती कल्याण गुन्हे शाखेचे साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दत्ताराम भोसले यांना मिळाली होती. त्यांनी ही माहिती तात्काळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे यांना दिली.

शिंदे यांच्या नेतृत्वाखाली साहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष उगलमुगले, साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दत्ताराम भोसले, हवालदार गुरनाथ जरग, विलास कडू, उमेश जाधव, अमोल बोरकर यांनी रुणवाल गार्डन भागात सापळा लावला. ठरल्या वेळेत आरोपी किरण गायकवाड, दीपेश जाधव घटनास्थळी आले. त्यांना परिसरात पोलिसांनी सापळा लावल्याची कुणकुण लागताच, त्यांनी तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. गुन्हे शाखेच्या पथकाने त्यांचा पाठलाग करून त्यांना घारिवली गाव हद्दीत पकडले.

आपण घेरले आहोत, याची जाणीव झाल्याने त्यांनी पोलिसांना प्रत्युत्तर देऊन पळ काढण्याचा प्रयत्न केला. भक्कम कडे केलेल्या पोलिसांनी त्यांची डाळ शिजू दिली नाही. अनेक वर्ष किरण, दिपेश यांची डोंबिवली ते अंबरनाथ परिसरात दहशत होती. किरण मानपाडा पोलीस ठाण्याच्या अभिलेखात सराईत गुन्हेगार आहे. दोन वर्षापासून पोलीस त्यांच्या मागावर होते. त्यांच्यावर संघटित गुन्हेगारीखाली कारवाई करण्यात आली आहे. शिवाजीनगर पोलिसांना त्यांचा ताबा देण्यात आला आहे.

काय आहे प्रकरण

नोव्हेंबर २०२२ मध्ये अंबरनाथ एमआयडीसीतील सुदाम हॉटेल परिसरातील रस्त्यावर गोळीबार झाला होता. बैलगाडा शर्यतीवरून चर्चा करताना झालेल्या वादातून आडिवलीच्या राहुल पाटीलसह त्याच्या साथीदारांवर दिपेश, किरण आणि त्यांच्या साथीदारांनी पिस्तुल, बंदुकांमधून बेधुंद गोळीबार केला होता. पंढरीनाथ फडके याच्या पुढाकाराने १७ जणांनी गोळीबार झाला होता. फडकेच्या टोळीत दिपेश, किरण यांचा समावेश होता. या हल्ल्यातून राहुल पाटील, मुकेश चित्ते, रवी जंगम, सोनू ठाकूर, अतुल केणे हे थोडक्यात बचावले होते. त्यानंतर पाटील, फडके गटात वैमनस्य निर्माण झाले आहे.

आगरी समाजाच्या उन्नतीसाठी एकजुटीने पुढे जाण्याचा मेळाव्यात निर्धार

पनवेल : आगरी समाजाच्या सध्याच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय परिस्थितीचा विचार करून सामूहिक संघटनेच्या बळावर काही ठोस कार्यवाही करण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यासाठी अखिल आगरी समाज परिषदेतर्फे आगरी समाज काल आज आणि उद्या या शीर्षकाखाली समाजातील लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक आणि समाज बांधव, भगिनींचा भव्य मेळावा रविवारी जासई येथील लोकनेते दि. बा. पाटील सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या वेळी मान्यवरांनी आपली मते व्यक्त करून समाजाच्या उन्नतीसाठी एकजुटीने पुढे जाण्याचा निर्धार व्यक्त केला.

या मेळाव्यास आगरी समाज परिषदेचे अध्यक्ष दशरथ पाटील, सल्लागार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी मंत्री व ज्येष्ठ नेते जगन्नाथ पाटील, खासदार बाळ्यामामा म्हात्रे, खासदार संजय पाटील, आमदार गणेश नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार मनोहर भोईर, कामगार नेते महेंद्र घरत, उद्योगपती जे.एम. म्हात्रे, भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, कार्याध्यक्ष जे.डी.तांडेल, सरचिटणीस दिपक म्हात्रे, शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल भगत, लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, कामगार नेते भूषण पाटील, राजेश गायकर, संतोष केणे, दशरथ म्हात्रे, माजी नगरसेवक विकास घरत, विजय चिपळेकर, प्रीतम म्हात्रे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुरेश ठाकूर, सोन्या पाटील, संतोष घरत, दीपक पाटील, भावना घाणेकर, वंदना घरत यांच्यासह आगरी समाजाचे बांधव आणि भगिनी उपस्थित होत्या. या वेळी आगरी समाजातील नवनिर्वाचित खासदार बाळ्यामामा म्हात्रे आणि खासदार संजय पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

प्रत्येक समाज आपापल्या संघटना बळकट करत आहेत. आम्हीही आमची आगरी समाजाची संघटना एकसंघ मातृसंस्था म्हणून अखिल आगरी समाजाच्या व्यासपीठावर एकत्र आणण्याचा हा पहिला प्रयत्न केला आहे. समाजातील नवतरुणांमध्ये जागृती व्हावी याकरिता या मेळाव्याचे आयोजन केले असल्याचे मत परिषदेचे अध्यक्ष दशरथ पाटील व्यक्त केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, प्रकल्पग्रस्तांचे झुंझार

नेते दिवंगत दि.बा. पाटीलसाहेबांचे नाव विमानतळाला देण्यात यावे यासाठी जो संघर्ष इथल्या भूमिपुत्रांनी आणि स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी केला, त्यामुळेच या आंदोलनाला मोठ्या प्रमाणात यश येताना दिसतंय.

आधीपासूनच समाज कष्टाने स्वाभिमानाने जगत राहिला, परंतु समाजाच्या कथा व्यथा या सर्व मांडण्याकरिता अखिल आगरी समाज परिषदचे व्यासपीठ निर्माण झाले, ही अभिमानाची गोष्ट आहे, असे गौरवोद्गार आमदार गणेश नाईक यांनी काढले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले की, आपण ज्या ज्या परिसरात राहतो त्या परिसराचे संदर्भ आणि प्रश्न बदलत चाललेले आहेत. समाज हा वेगवेगळ्या समाजामध्ये काम करणार्या आपणा सर्वांच्या धडपडणार्या आणि त्याचबरोबर चळवळ आंदोलनाच्या मार्गामध्ये पुढे जाणार्या आपल्या सर्व सहकार्यांमुळे समाज अधिकाधिक व्यापक आणि मोठा होत चाललेला आहे. आपण आज ज्या गावात बसलोय ती भूमी क्रांतीची आहे. या भूमीने १९८४ सालच्या आंदोलनाची धग पाहिलेली आहे. लोकनेते दि.बा. पाटीलसाहेबांच्या नेतृत्वाखाली सिडकोच्या विरोधातील आंदोलन आणि आंदोलनामुळे दि.बा. पाटीलसाहेबांचा लढा महाराष्ट्राच्या सीमारेषा ओलांडून पलीकडे गेला. या आंदोलनामुळे जे साडेबारा टक्के विकसित भूखंड भूमिपुत्र व प्रकल्पग्रस्तांना द्यायचे तत्व प्रस्तापित झाले आणि त्यामुळे पाटीलसाहेबांचे नेतृत्व आणि समाजाचा लढा साता समुद्रापलिकडे जाऊन पोहचला त्यातून आगरी समाजाची संघर्षशील प्रवृत्ती अधिक ठळक झाली. आपल्याला साहेबांनी एक मंत्र दिलाय की, लढल्याशिवाय मिळत नाही आणि लढणे हे थांबवायचे नसते. समाजाच्या मागण्यांसाठी व प्रगतीसाठी जोमाने वाटचाल करूया. अन्य उपस्थित वक्त्यांनीही आपले विचार व्यक्त केले. या वेळी आगरी दर्पण या मासिकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले.

मिरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्त यांच्या निर्देशानुसार

८ शाळांचे सीसीटीव्ही नियंत्रण मध्यवर्ती केंद्रित करण्याची कार्यवाही पूर्ण

भाईंदर : मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी सीसीटीव्ही नियंत्रण कक्षास भेट देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली. सदर पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) संजय दोंदे, उपायुक्त प्रसाद शिंगटे, सिस्टीम मॅनेजर राज घरत, सिस्टीम नालिस्ट मनस्वी म्हात्रे व महापालिका कर्मचारी उपस्थित होते.

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महापालिकेच्या एकूण ३६ शाळा असून या शाळांमध्ये दहा हजार विद्यार्थी हे शिक्षण घेत आहेत. शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून महापालिकेने यापूर्वी सर्व म्हणजेच एकूण ३६ शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण केले होते. सदर सीसीटीव्हीचे नियंत्रण हे त्या त्या शाळेतील मुख्याध्यापकांकडे देण्यात आले होते. महाराष्ट्र शासनाचे निर्णय व मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार सर्व शाळेतील सीसीटीव्ही नियंत्रण हे मध्यवर्ती केंद्रित करण्यात येत आहेत. आतापर्यंत एकूण आठ शाळांचे सीसीटीव्ही नियंत्रण हे मध्यवर्ती केंद्रित करण्यात आले असून मा. आयुक्त यांनी त्याचा आढावा घेऊन समाधान व्यक्त केले. शाळेतील परिसर, वर्ग, शौचालय या ठिकाणी सीसीटीव्ही महापालिकेने बसविले आहेत. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेबाबतीत कोणतीही हयगय केली जाणार नसून अधिकाधिक मनुष्यबळ वापरून उर्वरित शाळांचे सीसीटीव्ही नियंत्रण हे दिनांक ०५ सप्टेंबर २०२४ पूर्वी मध्यवर्ती केंद्रित करण्याचे सक्तीचे निर्देश मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

राज्य नाट्य स्पर्धेच्या प्रवेशिका सादर करण्याकरिता मुदतवाढ

ठाणे : महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या, राज्य नाट्य स्पर्धेतील प्रवेशिका सादर करण्यास ५ सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्य नाट्य स्पर्धेतील हौशी मराठी, हिंदी, संस्कृत, संगीत, बालनाट्य व दिव्यांग बालनाट्य या वर्गवारीसाठी प्रवेशिका सादर करण्याचा अंतिम दि. २६ ऑगस्ट २०२४ हा होता. मात्र काही नाट्यसंस्था व संघटनांनी या प्रवेशिका सादर करण्यास मुदतवाढ द्यावी, अशी मागणी सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे केलेली होती. जास्तीत जास्त संघाना या स्पर्धेत भाग घेता यावा यासाठी, प्राप्त झालेल्या निवेदनांचा विचार करून सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी प्रवेशिका सादर करण्यास मुदतवाढ देण्यात यावी, अशी सूचना सांस्कृतिक कार्य संचालनालयास केली होती.

या सूचनेच्या अनुषंगाने प्रवेशिका सादर करण्यास दि. ५ सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी दिली आहे.

या मुदतवाढ निर्णयाच्या अनुषंगाने, राज्य नाट्य स्पर्धेतील हौशी मराठी, हिंदी, संस्कृत, संगीत, दिव्यांग बालनाट्य, बालनाट्य या स्पर्धेत भाग घेण्यास इच्छुक असलेले संघ, ऑनलाइन पद्धतीने दि.५ सप्टेंबर २०२४ पर्यंत प्रवेशिका सादर करू शकतील, असे सांस्कृतिक कार्य संचालनालयाने कळविले असून संबंधित संघांनी https://mahanatyaspardha.com या वेबसाईटवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा, असे आवाहन संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

जिल्हा परिषद अंतर्गत ६९७ युवा प्रशिक्षणार्थींना नियुक्तीपत्र

ठाणे : महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजक्ता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जन-ठाणे कक्ष यांच्या मार्फत संयुक्तपणे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना जिल्हा परिषद अंतर्गत राबविली जात आहे. युवा प्रशिक्षणांतर्गत एकूण भरावयाची पदे ७३४ असून प्रत्यक्ष नियुक्ती दिलेले प्रशिक्षणार्थी ६९७ आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत जिल्हा परिषद ठाणे येथील विविध पदासाठी तात्पुरत्या स्वरुपात शिकाऊ कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुख यांच्या हस्ते युवा प्रशिक्षणार्थींना नियुक्ती पत्रक देण्यात आले. जिल्हा परिषद अंतर्गत युवा प्रशिक्षणार्थी संख्या ३३, पंचायत समिती २७०, ग्रामपंचायत ४३१ असे एकूण भरावयाची पदे ७३४ आहेत. उरलेल्या युवा प्रशिक्षणार्थी यांचे आदेशाच्या कागद पत्रांची पूर्तता करून नियुक्ती आदेश देण्याचे नियोजन सुरु आहे, अशी माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) प्रमोद काळे यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत तयार केलेल्या संकेतस्थळाच्या माध्यमातून रोजगार इच्छुक उमेदवार आणि रोजगार उपलब्ध करुन देणारे उद्योजक जोडले आहेत. रोजगार इच्छुक उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रशिक्षणातून मिळून त्यांची क्षमतावाढ होईल तसेच उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षण योजनेव्दारे उपलब्ध करुन देण्यासाठी उद्योजक व युवकांना महत्वाची ठरली आहे.

श्रीगणरायाच्या आगमनापूर्वी खड्डे रस्ता सुधारणा कामाला वेग



ठाणे (गणेश भोईटे) : श्री गणरायाच्या आगमनापूर्वी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळी कालावधीत पडलेले खड्डे दुरुस्त करून बाप्पाचे आगमन निर्विघ्नपणे पार पाडण्याकरिता सर्व विभागातील रस्ते सुधारण्याचे काम शहर अभियंता विभागाने युद्धपातळीवर हाती घेतले आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सर्व विभागांमधील मुख्य रस्ते तसेच अंतर्गत रस्तेही ९५% खड्डेमुक्त करण्यात आले आहेत त्याचप्रमाणे उर्वरित पाच टक्के रस्तेही खड्डे मुक्त करण्याचे काम दिवस-रात्र सुरू आहे. नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्या मार्गदर्शनानुसार, कार्यकारी अभियंत्यांसह सर्व अभियंते रस्ते सुधारणा काम सुरू असलेल्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहून या कामावर संपूर्ण लक्ष ठेवून आहेत.

ही दुरुस्ती करताना शास्त्रीय पद्धतीने खड्ड्यांच्या आकारमानानुसार अतिशय छोट्या खड्ड्यांसाठी कोल्ड मिक्स तसेच मोठा पॅच असल्यास त्याच्या दुरुस्तीसाठी डांबरीकरण किंवा मास्टिकचा वापर केला जात आहे. त्याचप्रमाणे काही मोठ्या आकाराच्या खड्डे दुरुस्तीसाठी काँक्रीट मिक्स अथवा इंटरलॉकचाही वापर केला जात आहे.

खड्डे दुरुस्ती करताना रस्त्याची पातळी व खड्डयामध्ये भरलेल्या मटेरियलची पातळी समान राहील याकडे बारकाईने लक्ष दिले जात असून खड्डे दुरुस्ती केलेल्या जागेवर पुन्हा खड्डा पडणार नाही अशाप्रकारे दुरुस्ती करण्याची काटेकोर काळजी घेण्याचे निर्देश शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्यामार्फत देण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. विघ्नहर्ता गणरायाचे आगमन सुव्यवस्थित रितीने होण्यासाठी व गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी आयुक्त महोदयांच्या निर्देशानुसार शहर अभियंता विभाग दक्षतेने कार्यरत असून ठाणे बेलापूर रस्ताही पूर्णपणे दुरुस्त करण्यात आला आहे. तसेच शहरातील उर्वरित पाच टक्के रस्त्यांची दुरुस्ती कामेही तत्परतेने पूर्ण करून घेण्यात येत आहेत.

पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचा लाभ घेण्यासाठी मुदतवाढ

ठाणे : शासनाने राज्यातील मान्यताप्राप्त शासकीय, शासन अनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालय/तंत्रनिकेतनांमध्ये शासनाने निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना निवासी व शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहू नये, यासाठी शासन निर्णयान्वये आदिवासी विकास विभागाच्या स्वयंम् योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र वसतिगृह निर्वाह भत्ता योजना लागू करण्यास मान्यता दिली आहे.

त्यानुषंगाने शासनातर्फे सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम् योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेंतर्गत अर्ज स्वीकृतीस दि.३१ जुलै २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि अद्यापी उच्च शिक्षण विभागातील काही अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु असल्याने विद्यार्थ्यांना विहित वेळेत अर्ज करण्यास शक्य न झाल्याने संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्याकडून अर्ज स्वीकृतीस मुदतवाढ देण्यात आलेली आहे. उच्च शिक्षणाच्या द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि.३ सप्टेंबर २०२४ असून याची निवड यादी दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी जाहीर केली जाणार आहे. तर प्रथम वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि.१५ ऑक्टोबर २०२४ असून याची निवड यादी दि.३० ऑक्टोबर २०२४ रोजी जाहीर केली जाणार आहे, असे इतर मागास बहुजन कल्याण, सहायक संचालक समाधान इंगळे यांनी कळविले आहे.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे यांच्या हस्ते

सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान

ठाणे : जिल्हा परिषद ठाण्याच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने प्रत्येक महिन्यात आनंददायी निवृत्ती वेतन योजना राबविण्यात येत आहे या अनुषंगाने ऑगस्ट महिन्यात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा आज पार पडला. जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे यांच्या शुभहस्ते ८ अधिकारी व कर्मचारी यांचा शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह, पेन्शन आदेश देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी मार्गदर्शन करताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करून पुढील आयुष्याकरिता सदिच्छा दिल्या. पुढील आयुष्यात उत्तम आरोग्य रहावे, आपल्या आवडी जपण्यासाठी वेळ द्यावा अशा शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी शिक्षक अरुण शेलवले यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की गेली ३९ वर्षे ठाणे ग्रामीण भागात शिक्षक म्हणून सेवा दिली, आज सेवानिवृत्त होताना आनंद होत आहे. प्रत्येक आठवड्यातील एक दिवस विना वेतन जिल्हा परिषदेच्या शाळेत जाऊन विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम करणार अशी ग्वाही दिली. हजारो विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी मोलाचे काम केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी सामान्य प्रशासन विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शिक्षण विभाग प्राथमिक ५, ग्रामपंचायत विभाग ०२, आरोग्य विभाग ०१ असे जिल्हा परिषदेचे एकूण ०८ अधिकारी व कर्मचारी ऑगस्ट महिन्यात सेवानिवृत्त झाले आहेत. प्राथमिक शिक्षक, विस्तार अधिकारी (ग्रा.पं), आरोग्य सेविका या पदावरील अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहे.

'शासनाच्या योजनांची दिंडी' अभियानामार्फत ग्रामीण भागात योजनांची जनजागृती

ठाणे : केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामपंचायतीमार्फत योजनांची जनजागृती करण्याकरिता 'शासनाच्या योजनांची दिंडी' अभियान राबवण्यात येणार आहे. अनेक वैयक्तीक लाभाच्या योजना जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामीण भागात 'शासनाच्या योजनांची दिंडी' अभियान दि. ३ सप्टेंबर ते २० सप्टेंबर पर्यंत राबविण्यात येत आहे.

ठाणे जिल्ह्यात गाव पातळीवर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची एकत्रित अभिसरणातून व विविध अंमलबजावणी यंत्रणांच्या सहभागातून राबविल्यास ठराविक कालमर्यादेत लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा लाभ मिळू शकेल. तसेच आतापर्यंत लाभ न मिळालेल्या गरजु व पात्र लाभार्थ्यापर्यंत योजनेचा लाभ मिळू शकेल.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली गाव पातळीवर प्रभावीपणे योजनांचा प्रसार व जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशाने शासनाच्या विविध विभागांनी एकत्रित येऊन त्यांच्या अभिसरण, सक्रिय सहभाग व पुढाकारातून शासनाच्या योजनांची दिंडी अभियान राबवण्यात येणार आहे.

शासनाच्या योजनांची दिंडी अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तहसिलदार (सर्व) नोडल अधिकारी व गट विकास अधिकारी पंचायत समिती (सर्व) सहाय्यक नोडल अधिकारी म्हणून कामकाज करणार आहेत. गावपातळीवर ग्रामपंचायत कार्यालय/ समाज मंदिर/ सार्वजनिक इमारत/ शाळा या ठिकाणी शासनाच्या योजनांची दिंडी अभियान राबवण्यात येत असून ग्रामस्थांनी या अभियानात पात्र व इच्छुक लाभार्थ्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थक्षेत्र दर्शन योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, रेशन कार्ड, जिल्हा परिषद/ पंचायत समिती सेस वैयक्तिक लाभाच्या योजना, आधार कार्ड/ अपडेशन, बँक अकाऊंट/बँक सखी LDM², आधार सीडिंग, अधिवास प्रमाणपत्र, जातीचा दाखला, संजय गांधी निराधार योजना, उत्पनाचा दाखला, वन हक्क दावे, जॉब कार्ड, आयुष्मान भारत योजना, कामगार पोर्टल नोंदणी, लेक लाडकी योजना, दिव्यांग तपासणी पोर्टल, स्कॉलरशिप, जन्म मृत्यु नोंदणी, विवाह नोंदणी, कृषी विभागातील विविध योजना, शासनाच्या विविध इन्शुरन्स योजना, CMEGP, PMEGP PMFME, क्रेडीट लिंकेज, PM² विश्वकर्मा, शाळाबाह्य मुले शाळा प्रवेश, किसान समृद्धी योजना, कातकरी घरकुल योजना (PM² जनमन), PM² जनधन, अटल पेन्शन अशा एकूण ३५ योजनांची अभियानांतर्गत नोंदणी व लाभ देण्यात येणार आहे.

दिपक फर्टिलायझर्स ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन व ईशान्य फाऊंडेशन यांच्यावतीने

महानगरपालिकेच्या माध्यमातून क्षयरूग्णांना पोषण आहार वाटप

पनवेल : प्रधानमंत्री क्षयरोग मुक्त भारत अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिकेने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत आज दिनांक ०२ सप्टेंबर रोजी कळंबोली नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र-४ याठिकाणी क्षयरूग्णांना दिपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन व ईशान्य फाऊंडेशन यांच्यावतीने महापालिकेच्या माध्यमातून पोषण आहार किटचे वाटप करण्यात आले.

यावेळी दिपक फर्टिलायझर्स प्रकल्प प्रमुख दिनेश प्रताप सिंह, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, दिपक फर्टिलायझर्सचे, सीएसआर फंडाचे सहाय्यक व्यवस्थापक संदीप काकडे, मानव संसाधन वरिष्ठ व्यवस्थापक दिपा चौगुले, प्रकल्प समन्वयक योगेश पाटील, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. अनिल पाटील, बालरोग तज्ज्ञ डॉ. मंदार बर्दापूरकर, आरोग्य क्षयरोग प्रचारक राहूल बळी,परिचारिका,कर्मचारी उपस्थित होते.

दिपक फर्टिलायझर्स प्रकल्प प्रमुख दिनेशप्रताप सिंह म्हणाले, सन २०२५ पर्यंत संपूर्ण भारत क्षयरोग मुक्त करण्यासाठी आपण कटिबध्द होणे गरजेचे आहे. क्षयरोग मुक्त भारत हे आपलं ध्येय आहे. या रोगापासून मुक्ती मिळविण्यासाठी आम्ही मदत करत आहोत.

मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी म्हणाले, केंद्र शासनाने प्रधानमंत्री क्षयरोग मुक्त भारत अभियान सूरू केले असून, या कार्यक्रमांतर्गत आयुक्त मंगेश चितळे व उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात 'निक्षय मित्र' संकल्पना राबवत आहे. या अंतर्गत क्षयरूग्णांना सामुदायिक सहाय्य करण्याबाबत पालिकेच्यावतीने आवाहन करण्यात येत आहे. दिपक फर्टिलायझर्स ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन व ईशान्य फाऊंडेशन यांच्यावतीने महापालिकेच्या माध्यमातून किटचे वाटप करून ते 'निक्षय मित्र' झाले आहेत.

यावेळी दिपक फर्टिलायझर्स ॲन्ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन व ईशान्य फाऊंडेशनच्यावतीने या कार्यक्रमांमध्ये १५० क्षयरूग्णांना गहू ,तांदूळ, डाळ, तेल, प्रोटीन पावडर या पोषण आहाराच्या किटचे वाटप करण्यात आले.

नायब तहसिलदार दिनेश पैठणकर आणि मंडळ अधिकारी-तलाठ्यांची

अनधिकृत रेती उत्खनन करणाऱ्यांवर धडक कारवाई

ठाणे : उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल criminal writ petition नं.२९११/२०२२ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे आणि प्रांताधिकारी उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख निवासी नायब तहसिलदार दिनेश पैठणकर यांच्यासह मंडळ अधिकारी मुंब्रा व मंडळातील सर्व तलाठी यांनी मुंब्रा ते कल्याण दरम्यान रेल्वे ट्रॅकजवळ होणाऱ्या अनधिकृत रेती उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी आज दि.०२ सप्टेंबर २०२४ रोजी बोटी द्वारे गस्त घातली असता, खाडी पात्रामध्ये अनधिकृत रेती उत्खनन करणारी अंदाजे १५ ब्रास रेतीने भरलेली एक बार्ज तसेच एक सक्शन पंप आढळून आले. अशाच प्रकारच्या दुसऱ्या कारवाईत खाडीपात्रामध्ये अनधिकृत रेती उत्खनन करणारी अंदाजे १३ ब्रास रेतीने भरलेली दुसरी बार्ज तसेच एक सक्शन पंप कळवा बाळकुम खाडीत आढळून आले. परंतु हे बार्ज व सक्शन पंप खाडीपात्रातून बाहेर काढता येत नसल्याने बार्ज व सक्शन पंप जाळून खाडीमध्ये बुडवून नष्ट करण्यात आले असून यापुढील कायदेशीर कार्यवाही सुरु आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१